# कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हणेगाव.

## ता. देगलूर. जि. नांदेड.

## विभाग - मराठी

## वर्ग : बी. ए. द्वितीय वर्ष. पेपर : साहित्य धारा S.L. मराठी

## Sem III पेपर III

प्रा. कांबळे एस.एस.

## हत्तीचा दृष्टांत – केशीराज बास

**परिचय :**

(मृत्यू १३१६) 'दृष्टांत पाठा'चा संकल्प केशीराज बास हे महानुभाव संप्रदायाच्या अधिकाळातील एक ख्यातनाम लेखक होते. महानुभाव संप्रदायाचे तात्विक अधिष्ठान दृढ बनविण्यात जसे त्यांचे कार्य महनीय आहे. नागदेवाचार्य यांच्याकडून महानुभाव पंथाची दीक्षा घेतली. प्रतिभा संपन्न कवी, विद्वान ग्रंथकार म्हणून परिचित होते. त्यांची पंथीय कामगिरी चिरंजीव ठरली. पंथीय तत्त्वज्ञानाचा हा प्रतिष्ठाप्राप्त प्रवक्ता आहे. पंथीय तत्वज्ञानाचे 'सूत्रपाठ','दृष्टांतपाठ' हे मान्यता प्राप्त ग्रंथ त्यांच्या नावावर असून 'रत्नमालास्त्रोत', ' दृष्टांतस्त्रोत', 'ज्ञानकलानिधीस्त्रोत' अशी स्त्रोत रचनाही त्यांनी केली आहे.

एकूण ११४ दृष्टांटाचे संपादन किशोबाने ‘दृष्टांतपाठ’ या ग्रंथात केली आहे. केशिराज बास यांना ‘केसोबास’ या नावानेही ओळखले जाते. सूत्र, दृष्टांत, व दृष्टांतिक अशी या ग्रंथाची मांडणी आहे. ते सहभागांचे परमेश्वर ही संकल्पना अनंत अशी मांडली आहे.मान वाला परमेश्वराची जाणीव त्यांच्या दृष्टीनुसार त्यांच्या अनुभवानुसार होत असते हा अतिशय सुंदर विचार या दृष्ट्यांपाटातून जास्त झाला आहे त्यातील पहिला

**सूत्र :**

जो जे होऊनी असे तोचि बोले ॥१॥

अनंत शक्ती परमेश्वर शेतकऱ्याची ही विषयावस्था करिती ॥२॥

**दृष्टांत :**

गावा हस्तीआला : तेथ जात्यांध हस्ती पाहों गेले : एके पावों देखीला एके सोंड देखीला एके कानू देखीला एके पाठी देखीला एके पोट देखीला एके पुस मग एकमेका संवादितीअरे तूवा हस्ती देखीला पाव देखीला तो म्हणे हस्ती खांबा सारिखा :

तोंड देखीला तो म्हणे हस्ती मुसळासारिखा : कानू देखीला तो म्हणे हस्ती सूपा सारीखा : पाठी  देखीला तो म्हणे हस्ती भिंतीसारिखा पोट देखीला तो म्हणे हस्ती कोथळीया सारिखा पुंस देखीला तो म्हणे हस्ती खराटीया सारिखा ।  ऐसे एकमेका उरोधीति । तयामध्ये डोळसू असे ते म्हणे हा हत्ती एकू एकू अवयव  अवयव होए : परि हस्ती नव्हे  : ऐसा अवयवीयूक्त तो हस्ती ॥

**दृष्टांतिक :**

तैसे  जयासि जे शक्ति  प्रकाशली असे तो तीए  शक्तीते परमेश्वरू म्हणे ज्ञानिया असे तो म्हणे हे ईश्वराची एकी एकी शक्ती होए । परी परमेश्वरू नव्हे ऐसा शक्तियुक्त तो परमेश्वरू ॥

**भावार्थ :**

जो जसा असेल (ज्याचा असा अनुभव असेल)  असा तो बोलतो. अनंत शक्तिमान परमेश्वर सकळांची विषयव्यवस्था करीत असतो.